गुरुवार, दि. १५ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# या अभ्यासिकेतून भविष्यात वर्ग 1 चे अधिकारी निर्माण होतील - प्रदीप सोळुंके

## मराठा क्रांती भवन संचलित छत्रपती संभाजीराजे अभ्यासिकाचे उदघाटन उत्साहात

**परतूर । प्रतिनिधी** - शहरातील मराठा क्रांती भवन संचालित '' छत्रपती संभाजी राजे '' अभ्यासिकेमुळे भविष्यात वर्ग १ चे अधिकारी नक्की निर्माण होतील असा मला ठाम विश्वास आहे असे मत लेखक, लेखक, ख्यातनाम वक्ते तथा ह. भ. प. प्रदिप (दादा) सोळुंके यांनी व्यक्त केले. ते मराठा क्रांती भवन संचलित छत्रपती संभाजी राजे अभ्यासिका चे उदघाटन व छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबिर प्रसंगी मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी गटविकास अधिकारी राजेश तांगडे यांच्यासह एकूण ७६ रक्तदातात्यानी रक्तदान केले.

पुढे मार्गदर्शन करताना सोळुंके म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव आपण सर्वांनी दिले याचा अर्थ आपण खरे संभाजी महाराज वाचलेले आहेत व ते आचरणात आणत आहात याचा मनस्वी आनंद आहे. कारण संभाजी महाराज हे लढवय्ये होते एवढेच अनेकांना माहित आहेत. मात्र संभाजी राजेंना घडवताना जिजाऊ व छ. शिवाजी महाराज यांनी प्रचंड मेहनत घेऊन संस्कारी, व लाडवैय्ये बनवले. त्यासाठी त्यांनी हुशार गुरूंची निवड केली, तत्यामुळे संभाजी यांना प्रचंड वाचनाची सवय लागली, म्हणून त्यांनी रामायण, महाभारत, वाचले यामुळे ते लेखन करू लागले त्यांनी त्यांच्या आयुष्यात ४ वेद, ३ उपनिषद, पुराणे यांचे वाचन केले. म्हणून त्याचा प्रचंड अभ्यास झाला व ते ८ भाषा शिकले व त्यांनी बुधभूषणम् , नायिकाभेद , नखशीख व सातशतक असे एकूण ४ ग्रंथ लिहिले. म्हणून अशा लेखक व वाचा असणाऱ्या संभाजी राज्यांचे नाव आपण या अभ्यासिकेला दिले यावरून येथे येणारे विध्यार्थी नक्खिच राजांचे विचार आचरणात आणतील यांची मला खात्री आहे. म्हणून येथे वाचनासाठी येतानाच्या प्रत्येकांनी जे दैववादी असतात ते नामर्द असतात व जे प्रयत्नवादी असतात ते इतिहास घडवतात. हे महाराजांचे वाक्य सर्वांनी कायम लक्षात ठेवावे. असेही ते म्हणाले.

तसेच पालकांनी आपल्या पाल्याशी कायम संवाद ठेवावा, त्यांच्यासोबत मित्रासारखे वागावे, त्यांच्यासोबत वेळ घालवत रहा कारण आता वेळ घालवला तरच ते म्हातारपणी तुम्हाला वेळ देतील असा सल्ला हि या प्रसंगी प्रदीप सोळुंके यांनी दिला.

''तालुक्यातील मुला-मुलींमध्ये खूप क्षमता असतात, परंतु योग्य मार्गदर्शन व अभ्यासयोग्य जागेअभावी नेहमी ते मागे राहतात. शहरात अशा प्रकारची वाचनालये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे,'' असे मत गटशिक्षणाधिकारी प्रेरणा लोंढे यांनी उद्घाटनप्रसंगी मांडले.

याप्रसंगी विचापीठावर उदघाटक म्हणून प्रदीप (दादा) सोळुंके, प्रमुख उपस्थितीमध्ये गटविकास अधिकारी राजेश तांगडे, नगर पालिकेचे प्रभारी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, पोलिस निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे, गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रेरणा लोंढे, अभिनेते राजकुमार तांगडे, माजी प्राचार्य भगवानराव दिरंगे, लॉयन्स क्लब चे मनोहरराव खालापूर, अंकुशराव तेलगड, अखिल काझी, विजय नाना राखे आदी उपस्थित होते.

सदरील अभ्यासिका ही वाताणूकुलीत असून येथे मुलांमध्ये वाचनाची आवड व अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी, छोट्या शहरातील विद्यार्थी मागे राहू नयेत तसेच विद्यार्थ्यांना विविध ग्रंथ, पुस्तके उपलब्ध व्हावी, या उद्देशाने अभ्यासिका आणि वाचनालयची सुरुवात केली आहे. येथे तालुक्यातील गोर गरीब घरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ५० विद्यार्थ्यांना अभ्यास करता यावा अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. असे मत मराठा क्रांती भवन चे अध्यक्ष गणेश नळगे व समन्वयक अशोक



तनपुरे यांनी प्रस्ताविकात मांडले.

**मदतीचा ओघ सुरू** - या अभ्यासिकेसाठी डॉ. राम बरकुले यांनी ५० पुस्तकांचा संच, कैलास उफाड सर यांनी ३ फॅन, डॉ. भगवानराव दिरंगे यांनी १० हजारांचा धनादेश तर मनोहरराव खालापूर यांनी ११ हजार रु. मदत म्हणून दिले.

याप्रसंगी मराठा क्रांती भवन चे अध्यक्ष व सर्व समन्वयक, शहरातील डॉक्टर, वकील, नगरसेवक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास शेळके यांनी केले तर आभार बद्रीनाथ बाबर यांनी मानले.

---

युवा आदर्श

### संभाजीराजे ...

संभा राज्याभिषेक
खुशीत सारे किल्ले
भगव्या रंगा न्हाहले
नाचे गल्ली मोहल्ले
राजद्रोही कैंद्यानाही
रे जीवन दान दिल्हे
बुऱ्हाणपुरी खजिना
स्वराज्य कोष भरले
भगवे झेंडे लहरती
आनंदी झाले जिल्हे
स्वराज्याचे स्वप्नगोड
अरे प्रत्यक्षांतआल्हे
भेटवस्तू उस्फुर्त त्या
भरले तिजोऱ्या गल्हे
समानतेच्या तराजूत
निर्भेळ सुख तोलले
दगड धोंडे न् कपारी
जयकार सारे बोलले
वारा सुगंधीत झाला
दिशांनी गाणे गायले
आवाज पोचे दिल्ली
मुगलसाम्राज्य हलले
शत्रुला असेल वाटले
उगाच केले बा हल्ले
अभिषेक करता जल
रे स्वत:चं धन्य झाले
क्षण अविस्मरणीय ते
इतिहासा अमर केले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# श्री म स्था जैन विद्यालयाचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश

**जालना । प्रतिनिधी** - येथील श्री महावीर स्थानकवासी जैन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शालांत प्रमाणपत्र परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल ९२.२१ टक्के एवढा लागला आहे. विद्यालयातील एकूण ३२२ पैकी २९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी आचल पतंगे ९६.८०, साधना चुंबळकर ९५.६०, यश श्रीराम ९५.६०, श्रेया शहाणे ९३.८०, अथर्व काटकर ९२.00, भाविका गाभणे ९१.८०, आयुष राजपूत ८९.६०, अनुष्का मुकणे ८९.४०, प्रज्वलिता वाघमारे ८९.२०, पिया चोपडा ८८.८०, ओमकार लहाने ८८.८०, सुरज गायकवाड ८८.६०, तनिषा बेलसुरे ८८.00 श्रेया जाधव ८४.६0 एवढे गुण मिळवून यश संपादन केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे श्री वर्धमान स्थानकवासी जैन




श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, महामंत्री डॉ. धरमचंद गादिया, उपाध्यक्ष भरतकुमार गादिया, सहसचिव कचरूलाल कुंकूलोळ, कोषाध्यक्ष संजयकुमार लुनावत, विश्वस्त नेमीचंदजी रुणवाल, डॉ गौतमचंद रुणवाल, संजयकुमार मुथा, संजयकुमार बंब. प्रकाशचंद सुराणा, शांतीलालजी संचेती तसेच शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष जितेशकुमार भायानी, सचिव कांतीलाल कुंकूलोळ, उपाध्यक्ष विजयकुमार भंडारी कोषाध्यक्ष विजयकुमार नहार शालेय शिक्षण समितीचे सर्व पदाधिकारी मुख्याध्यापक श्री एस. एम. वानगोता, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# शिवलाल राठी यांचे निधन

**जालना** - येथील दैनिक पार्श्वभुमीचे संपादक दिलीप राठी, नंदकिशोर व अरुण यांचे वडील शिवलाल बन्सीलाल राठी (वाकुळणीवाला) यांचे बुधवार (दि १४) रोजी दुपारी चार वाजेच्या दरम्यान निधन झाले.



मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. गुरुवार (दि १५) रोजी सकाळी ९ वाजता निजी निवास विधाता, प्रियदर्शनी कॉलनी, संभाजीनगर जालना येथून त्यांची अंत्ययात्रा असून अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. मरणोत्तर त्यांचे नेत्रदान करण्यात आले.




**झाडे लावा**

**झाडे जगवा**

## संपादकीय

# धक धक गर्ल

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार अभिनेत्री, लाखो दिलांची धडकन, धक धक गर्ल माधुरी दिक्षितचा आज ५८ वा वाढदिवस. माधुरी दीक्षित म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीला पडलेले एक मधुर स्वप्न. आज जे ४० ते ६० या वयोगटात आहे त्यांच्यासाठी माधुरी म्हणजे सर्वस्व होते. माधुरीला पाहतच हे लोक लहानाचे मोठे झाले. माधुरीचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहणाऱ्यांची संख्या त्या काळात लाखोंच्या घरात होती. १५ मे १९६७ रोजी जन्मलेली माधुरी म्हणजे सुंदरता, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम. वयाच्या १७ व्या वर्षी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या माधुरीचा पहिलाच चित्रपट अबोध आपटला त्यामुळे तिच्या पदार्पणाची दखल कोणी घेतली नाही. त्यानंतर तिने काही बी ग्रेड चित्रपटातही भूमिका केल्या. उत्तर दक्षिण हा तिचा तसा पहिला व्यावसायिक चित्रपट मात्र यातीलही तिच्या भूमिकेची कोणी दखल घेतली नाही मात्र तेजाब चित्रपट आला आणि तिचे नशीबच बदलले. तेजाब चित्रपटातील एक दो तीन... हे गाणे जबरदस्त हिट झाले. या गाण्यातील तिच्या नृत्याने तरुणांना वेड लावले. या चित्रपटातील तिने साकारलेली मोहिनी नावाची भूमिका प्रेक्षक आजही विसरू शकले नाहीत. माधुरीने हा चित्रपट आपल्या अभिनय आणि नृत्याने यशस्वी करून दाखवला. या चित्रपटानंतर निर्माते दिग्दर्शक तिच्या घरी रांगा लावू लागले. सलग आठ चित्रपट फ्लॉप झालेल्या माधुरीची तेजाबच्या यशानंतर यशस्वी अभिनेत्रींमध्ये गणना होऊ लागली. या चित्रपटात तिचा नायक अनिल कपूर हा होता. ही जोडी प्रेक्षकांना खूप आवडली. पुढे या जोडीने परींदा, रामलखन, किशन कन्हैया, जीवन एक संघर्ष, जमाई राजा, खेल, बेटा, जिंदगी एक जुआ, राजकुमार, पुकार असे अनेक हिट चित्रपट दिले. माधुरीची जोडी केवळ अनिल कपूरशीच जमली असे नाही तर जॅकी श्रॉफ, मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर, संजय दत्त, शाहरुख खान, अमीर खान, सलमान खान अशा सर्वच अभिनेत्यांशी जमली. तिने अभिनय केलेले जवळपास सर्वच चित्रपट यशस्वी झाले. तेजाब, दिल, साजन, परींदा, राम लखन, खलनायक, हम आप के है कौन, प्रेमग्रंथ, मृत्युदंड, बडे मिया छोटे मिया, बेटा, कोयला, दिल तो पागल है, देवदास हे चित्रपट तिकीट बारीवर तुफान यशस्वी ठरले. तिचे अनेक चित्रपट हिट तर काही सुपरहिट झाले. तिच्या हम आपके है कौन या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटातील तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने अनेकांना घायाळ केले. या चित्रपटातील तिची भूमिका पाहून प्रसिद्ध चित्रकार एम एफ हुसेन हे तिच्यावर इतके फिदा झाले की त्यांनी तिचे शेकडो पोट्रेट बनवले यावरून लोक त्यांना माधुरी फिदा हुसेन असे म्हणू लागले. त्यांनी तिच्यावर गजगामीनी नावाचा चित्रपटही बनवला. माधुरीच्या नावाचे गाणेही आले ( माधुरी मिली मुझे रस्ते मे...) इतकेच काय तर तिच्या नावाने चित्रपट देखील आला ( मै माधुरी दीक्षित बनना चाहती हु) तिला अनेक पुरस्कार मिळाले. प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार तिने तब्बल पाच वेळा मिळवला. दिल, बेटा, हम आप के है कौन, दिल तो पागल है, देवदास या चित्रपटातील तीच्या भूमिकेसाठी तिला फिल्मफेअरने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार दिला. तिने राष्ट्रीय पुरस्कारही मिळवला. भारत सरकारने तिला पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले आहे. माधुरीने जवळपास ७० हुन अधिक चित्रपटात भुमीका केल्या. यातील तिच्या भूमिका आजही लोकप्रिय आहेत. लोकप्रेयतेच्या शिखरावर असतानाच तिने श्रीराम नेणे या अमेरिकास्थित उद्योगपतीशी लग्न केले. लग्नाआधी तिचे संजय दत्तशी अफेअर आहे ते दोघे लग्न करणार असे फिल्मी मासिकात छापून येत होते तिने मात्र या सर्व अफवा असल्याचे सिद्ध केले आणि लग्नानंतर थेट अमेरिका गाठली. अमेरिकेत काही वर्षे राहिल्यावर ती पुन्हा मुंबईत परतली. मुंबईत परतल्यावर तिने गुलाब गँग आणि देढ इष्कीया या चित्रपटाद्वारे पुनरागमन केले. त्यानंतर तिने टेलिव्हिजनवर झलक दीखला जा, डान्स इंडिया डान्स यासारख्या नृत्यावर आधारित रिऍलिटी शो चे जज म्हणूनही काम केले. आज इतक्या वर्षानंतरही माधुरीची जादू कायम आहे. गेल्या दोन दशकात शेकडो अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीत आल्या आणि गेल्या पण तिची बरोबरी करणारे तर सोडाच पण तिच्या जवळपास पोहचेल अशी एकही अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीला मिळाली नाही यातूनच माधुरीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. सौंदर्य, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेल्या सदाबहार अभिनेत्री माधुरी दिक्षितला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पुण्यात डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचा राज्यस्तरीय मेळावा

**पुणे -** तोंडावर असलेल्या पावसाळ्याच्या व देशातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोकणातील सावंतवाडी येथे होणारे तिसरे महाअधिवेशन स्थगित केल्या नंतर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा महामेळावा येत्या २५ मे २०२५ (रविवार) रोजी आयोजित करण्याचा आज येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राजा माने हे होते.राज्य सचिव महेश कुगावकर, सह सचिव केतन महामुनी,राज्य संघटक शामल खैरनार,राज्य कार्यकारिणी सदस्य दीपक नलावडे,अमोल पाटील हे उपस्थित होते. सतीश सावंत, विकास भोसले, इक्बाल शेख,तेजस राऊत,मुरलीधर चव्हाण तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष गणेश हुंबे, अजिंक्य स्वामी, संजय भैरे,प्रशांत कटारे, राजाराम मस्के आदी या बैठकीत ऑनलाईन सहभागी झाले. महामेळाव्यात महाराष्ट्र महागौरव पुरस्कारांचे वितरण तसेच पत्रकारांच्या मुला-मुलींच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानचे उद्घाटन करण्याचा निर्णय झाला. पुणे येथील कार्यक्रम स्थळ व प्रमुख पाहुण्यांची नावे येत्या दोन दिवसांत जाहीर केली जाणार आहेत.

## सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाची तयारी पूर्ण : उत्कंठा शिगेला !

# गोमंतकात प्रथमच भरणार हजारो भक्तांचा कुंभमेळा; देव, देश व धर्म जागृतीचा संदेश!

**फोंडा (गोवा) -** जसे कुंभमेळ्याला लाखो कोट्यवधी भाविक, संत-महंत एकत्र येतात, तसेच पहिल्यांदाच गोव्याच्या पावन भूमीवर १७ ते १९ मे कालावधीत एक दिव्य आध्यात्मिक कुंभमेळा भरतो आहे - 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव !' या महोत्सवात २३ देशांतील नागरिक आणि संत-महंत, धर्मप्रेमी हिंदू, तसेच २५ हजारांहून अधिक भाविक ४ ते ५ दिवस वास्तव्य करणार असून संतांच्या वाणीची ज्ञानगंगा, एक कोटी रामनाम जपयज्ञ, शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, विविध संतांच्या पावन पादुका, एक हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दुर्मिळ दर्शन आणि महाधन्वंतरी ते शतचंडी यज्ञयाग या उपक्रमांचा समावेशही आहे. महोत्सवाची सर्व तयारी पूर्ण होत आली असून लवकरच सर्वांना भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम गोव्यात पहायला मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली. ते फर्मागुडी, फोंडा, गोवा येथील अभियांत्रिकी मैदानावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

या वेळी महोत्सवाची सिद्धता पाहिल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेला उद्योजक श्री. जयंत मिरिंगकर, गोमंतक मंदिर महासंघाचे सचिव श्री. जयेश थळी, हिंदु जनजागृती समितीचे गोवा राज्य संघटक श्री. सत्यविजय नाईक व श्री. सुचेंद्र अग्नी उपस्थित होते. या वेळी श्री. अभय वर्तक पुढे म्हणाले की, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३व्या जन्मोत्सवानिमित्त होणारा हा महोत्सव म्हणजेच रामराज्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल आहे. या महोत्सवातून साधक आणि धर्मप्रेमी हिंदू देव, देश अन् धर्म रक्षणासाठी नवा संकल्प घेऊन कृतीशील होतील.

शंखनाद महोत्सवाची जागृती : गोव्यात सर्वत्र जागृती करणारे शेकडो फ्लेक्स फलक, विविध चौकात शंखनाद करणारे भगवान श्रीकृष्णाचे कटआऊट्स, विविध मार्गांवर स्वागत कमानी, साधूसंतांची छायाचित्रांचे भव्य फलक, महोत्सवाच्या मुख्य प्रवेशद्वारावर मंदिराच्या आकाराची भव्य कमान आदी भक्तीमय वातावरण निर्माण करत आहेत. महोत्सवात ३८ फूट उंचीचा भव्य धर्मध्वज उभारण्यात येणार आहे.




सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवातील वैशिष्ट्ये : महोत्सवाचे क्षेत्रफळ १ लाख २६ हजार चौरस मीटर क्षेत्रामध्ये पसरलेले असून त्यात २५ हजार लोकांना बसण्यासाठी वातानुकुलित मंडपव्यवस्था करण्यात आली आहे. एकावेळी ८ हजार लोकांच्या भोजनाची व्यवस्था, हजारो वाहनांसाठी १७ पार्किंग झोन, भाविकांसाठी ३५० प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासह भव्य धार्मिक ग्रंथ विक्री केंद्र, गो-कक्ष, श्रीअन्नपूर्णा कक्ष, गुरुमंदिर, ६ हजार चौरस फूटाचे शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, १५ संतांच्या पावन पादुका कक्ष, एक हजार वर्षांपूर्वीचे सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन कक्ष असेल; तसेच महोत्सवात सुरक्षेसाठी पोलीस मनोरे, सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक, अनेक रुग्णवाहिका, बाईक म्बुलन्स; अग्निशमन दलाच्या गाड्या, वैद्यकीय केंद्रात १६ डॉक्टर्स, सुव्यवस्थापनासाठी प्रशासनाच्या २५ विभागांसाठी जागा, माध्यम प्रतिनिधींसाठी कक्ष, तसेच अन्य आवश्यक त्या सुविधा असणार आहेत.

या महोत्सवात सुरक्षेच्या कारणास्तव सर्वांना प्रवेशासाठी शासनमान्य ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. तसेच येतांना बॅगा आणू नयेत, अशी विनंती आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पहाण्यासाठी आणि अधिक माहिती जाणून घेण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळाला भेट द्या !

# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ.जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि सनातन संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष यांच्या निमित्ताने फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र, गोवा, उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अन्य मंत्री, तसेच संत उपस्थित रहाणार आहेत. या कार्यक्रमाला सनातन धर्माकडे आकृष्ट झालेले १५ देशांतील अनेक जण येणार आहेत. या महोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून 'न भूतो न भविष्यती' अशा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सनातन संस्थेचे कडून करण्यात आले आहे.

वैश्विक इतिहासात अनेक संस्कृती उदयास येऊन लोप पावल्या, उदा. इजिप्शियन, ग्रीक, रोमन संस्कृती आदी; पण राजकीय संघर्ष, परकीय आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती आदी संकटांना तोंड देत एकच संस्कृती टिकून राहिली, ती म्हणजे 'सनातन संस्कृती' ! सनातन म्हणजे शाश्वत, चिरंतन टिकणारे, तरीही नित्यनूतन असणारे तत्त्व ! सनातन धर्माने नेहमीच विश्वकल्याणाची संकल्पना मांडली आहे. सनातन धर्म हाच भारताचा प्राण आहे. जोपर्यंत सनातन धर्माचे अनुकरण होत होते, तोपर्यंत भारत वैभवाच्या शिखरावर होता; पण गेल्या काही दशकांमध्ये सनातन धर्माकडे हेतूपुरस्सर हेटाळणीच्या रूपात पाहिले गेले. परिणामस्वरूप अनेक कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, धार्मिक, तसेच राष्ट्रीय संकटे निर्माण झाली. आज आंतरराष्ट्रीय अनुदानावर




पोसल्या जात असलेल्या अनेक व्यक्ती, तसेच संघटना सनातन धर्म संपवण्याचा विडा उचलून कार्यरत झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सनातन धर्माच्या रक्षणासाठी देव, देश आणि धर्म यांची सेवा करणार्या व्यक्ती, संस्था, तसेच संघटना यांचे संघटन अन् जागृती होणे आवश्यक आहे. सनातन धर्माच्या बळकटीकरणातूनच रामराज्याची , तेजस्वी राष्ट्राची निर्मिती शक्य आहे. त्यासाठीच गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सनातन संस्थेच्या माध्यमातून २५ वर्षे राष्ट्र आणि धर्म कार्य चालू आहे. याचाच एक भाग म्हणून सनातन राष्ट्रासाठी १ कोटी जपयज्ञ करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. संतांच्या तेजस्वी वाणीतून सनातन राष्ट्राचा उद्घोष करणारे संत संमेलनही आयोजित करण्यात आले आहे. धर्मामुळे राष्ट्राचा विजय होतो. त्यामुळे मी धर्माचे म्हणजेच भगवंताचे देणे आहे, असे समजून अखंडित कार्य करायला हवे. आताचा हा योग महाभारताच्या काळाप्रमाणे आहे असेही म्हटले आहे.. धर्माला ग्लानी आलेली असतांना ईश्वराच्या संकल्पाने हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा शंखनाद गोवा येथे होणार आहे.

सनातन संस्था सर्व संघटनांना एकत्र करून मोठे कार्य करत आहे. हिंदु देवतांनी हातात शस्त्रे धारण केली आहेत. राष्ट्राच्या सीमा या शस्त्रांनीच आखायच्या असतात, हे ध्यानात घेऊन या महोत्सवात शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. सर्व धर्माभिमानी हिंदूंसाठी ही पर्वणी आहे.

**१० ते १५ संतांच्या चरण पादुकांचे दर्शन**

या कार्यक्रमाच्या माध्यमातून होणार आहे. प.पू.श्रीधर स्वामी, कानिफनाथ महाराज, साईबाबा, प.पू. गगनगिरी महाराज, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, प.पू. भक्तराज महाराज अशा १० हून अधिक संतांच्या पादुकांच्या दर्शनाचा लाभ आपल्याला होणार आहे.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्याविषयी बोलणे, हे माझे सद्भाग्य समजतो. जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी आली, तेव्हा तेव्हा भगवंताने अवतार धारण केला आहे. ज्याप्रमाणे महर्षि व्यास यांनी वेद, उपनिषदे या साहित्याचे संपादन केले, तेच कार्य सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले २१ व्या शतकात करत आहेत. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी जनसामान्यापर्यंत पोचवण्यासाठी साधक निर्माण केले. त्यामुळे हे कार्य घराघरांत पोचले.

आज 'सनातन' हा विषय मोठ्या प्रमाणात चर्चिला जात असून हिंदु राष्ट्राच्या मागणीनेही जोर धरला आहे. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी तब्बल २७ वर्षांपूर्वी, म्हणजे ज्या काळी 'सनातन' हा शब्द सोडा; पण 'हिंदु' हा शब्द उच्चारणेही धाडसाचे ठरवले जायचे, अशा काळी 'ईश्वरी राज्याची स्थापना' हा ग्रंथ लिहून अध्यात्मावर आधारित राष्ट्ररचना ही संकल्पना मांडली. संतांचा द्रष्टेपणा यातून दिसून येतो. आतापर्यंत सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी धर्म, अध्यात्म आदींविषयी ३८० हून अधिक ग्रंथ संकलित केले असून भारतीय कला-विद्या यांच्या पुनरुज्जीवनासाठी अनेक उपक्रम चालू केले आहेत. हिंदुत्वावरील आघात सर्वदूर पोचवण्यासाठी त्यांनी 'सनातन प्रभात' हे हिंदुत्वनिष्ठ नियतकालिक चालू केले. त्यांच्या प्रेरणेने हिंदूऐक्यासाठी अनेक चळवळी राबवल्या जात आहेत. या कार्याचा अल्पावधीत झालेला विस्तार ही त्यांच्या दैवी कार्याचीच साक्ष आहे.

सनातन संस्थेचा रौप्यमहोत्सव आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा जन्मोत्सव यानिमित्त आयोजित केलेला 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा केवळ धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम नसून तो धर्म आणि राष्ट्र रक्षणाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याचा हा शंखनाद आहे. या निमित्ताने सनातन धर्माच्या सेवेसाठी कृतीशील आणि गतीशील होणे, हे एकप्रकारे राष्ट्ररचनेच्या अर्थात् धर्मसंस्थापनेच्या कार्यात सहभागी होणेच आहे. हीच सध्याच्या काळातील साधनाही आहे.

सनातन संस्थेचे मोठे कार्य असून ते वाहात्या नदीप्रमाणे आहे. ज्यामुळे प्रदेश 'सुजलाम्', 'सुफलाम्' होतो. यामुळे मन, बुद्धी आणि चित्त यांची मशागत होते.

सनातन संस्था गेल्या २५ वर्षांपासून हिंदु धर्मरक्षणाचे कार्य करत आहे. सनातन संस्था हिंदूंना धर्म आणि मूल्य यांच्या संदर्भातील ज्ञान देत आहे. सनातन संस्था हिंदु धर्माचा आधारस्तंभ आहे. संस्थेने २५ वर्षे पूर्ण केली आहेत. गुरुमहाराज आठवलेजी (सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले) त्यांचा ८३ वा जन्म दिवस आहे.त्यांचे चरणी कोटी प्रणाम. यानिमित्ताने मी सनातन संस्थेचे अभिनंदन करतो.



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जिल्हा जळगाव .**
**मोबाईल ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

## सम्राट अशोक शिक्षण संस्था संचलित माध्यमिक विद्यालयांचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**जालना | प्रतिनिधी -** नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या परीक्षेत भोकरदन येथील सम्राट अशोक शिक्षण संस्था संचलित माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या निकालात सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दीपभारती माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय दानापूर, वडोद तांगडा तसेच माहोरा कुंभारझरी या विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर ता. भोकरदन या विद्यालयामधून कु. तेजल गणेश वाघ हिने ९१.६० टक्के गुण संपादित करून प्रथम क्रमांक पटकावला आहे.कु. कल्याणी राजू माळोदे हिने ९१ टक्के गुण संपादित करून द्वितीय तसेच सुमित ज्ञानेश्वर जाधव व अश्विनी समाधान मुळे यांनी ९०.६० टक्के गुण संपादित करून संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळविला आहे.

दीपभारती माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय वडोद तांगडा ता. भोकरदन या विद्यालयामधून आकांक्षा विनायक तांगडे या विद्यार्थिनीने ९२.८० टक्के गुण संपादित करून प्रथम क्रमांक, रुपाली गजानन तांगडे हिने ९२ टक्के गुण संपादित करून द्वितीय तसेच प्रतीक्षा प्रवीण तांगडे याने ९१ ८० गुण संपादित करून तृतीय क्रमांक पटकावला आहे. दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा ता. जाफ्राबाद जि. जालना या विद्यालयामधून संघपाल दादाराव येलदोडे याने ८७.८० टक्के गुण संपादित करून प्रथम क्रमांक, भारती ज्ञानेश्वर गोरे ८४.२० टक्के गुण संपादित करून द्वितीय तसेच ऋतुजा देवाजी रोडगे हिने ८३.४० टक्के गुण संपादित करून तृतीय क्रमांक पटकावला आहे.लुंबिनी विद्यालय कुंभारझरी ता. जाफ्राबाद जि. जालना या विद्यालयामधून प्रज्ञा यशवंत पैठणे हिने ८८.८० टक्के गुण संपादित करून प्रथम क्रमांक, अश्विनी सुभाष चव्हाण हिने८७.६० टक्के गुण मिळवून द्वितीय तसेच ऋतुजा किशोर दुन्ड्यार या विद्यार्थिनीने ७९.२० टक्के गुण संपादित करून तृतीय क्रमांक पटकावला आहे उत्तीर्ण विद्यार्थांचे सम्राट अशोक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुदामराव सदाशिवे व सचिव दीपक सदाशिवे, विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एस. कासार,एस.के. पांडे, वाय.एस. गवळी, एस.टी. कर्वे यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### गटनेते बदलण्याचा प्रस्ताव फेटाळण्याचा निर्णय पुन्हा कोर्टात

# कर्जत नप नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार!

**कर्जत । प्रतिनिधी -** कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष निवडीपूर्वी गटनेता बदलण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी फेटाळला खरा पण आता कर्जतच्या सर्वच नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार आली आहे. शिवाय न्यायालयाने नगरसेवकांसह जिल्हाधिकाऱ्यांनाही कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यामुळे न्यायालयातील पुढील सुनावणीकडे कर्जतकरांचे लक्ष लागले आहे. कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. उषा राऊत यांना पदावरून दूर करण्यासाठी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. नगराध्यक्ष पदाची निवडणूक होण्यापूर्वी गटनेता बदलण्याचा प्रस्ताव आमदार रोहित पवार यांच्या गटाने जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी राजकीय दबावाखाली तो फेटाळल्याचा आरोप झाला आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाविरोधात आमदार रोहित पवार यांच्या गटाने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय बाजूला सारत फेरसुनावणी घेऊन गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार हे प्रकरण पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांच्या कोर्टात आले. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी ९ मे रोजी घाई-घाईने सुनावणी घेऊन पुन्हा एकदा श्री. अमृत काळदाते यांनी दिलेला गटनेता बदलाचा प्रस्ताव फेटाळला. या विषयाचा निर्णय घेण्यापूर्वी सर्व उपस्थित गटाच्या सहयांचे नमुने हस्ताक्षर तज्ञांकडून पडताळणी करण्याची विनंती त्यांनी केली होती. परंतु त्याचा कोणताही विचार अथवा उल्लेखही न करता केवळ विरोधी सदस्यांनी त्यांच्या मूळ सह्या असतांनाही बैठक झाल्याचे नाकारल्यामुळे गटनेतेबदलाचा अर्ज फेटाळला. जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय देखील दबावाखालीच घेतल्याचा आरोप श्री. अमृत काळदाते यांनी केला आहे आणि याविरोधात त्यांनी पुन्हा एकदा उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले.

काळदाते यांनी नव्याने दाखल केलेल्या याचिकेत मांडलेल्या मुद्द्यांमध्ये तथ्य आढळल्यामुळे काल (मंगळवार) उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी व सर्व प्रतिवादी नगरसेवक यांना याबाबत नोटीस काढण्याचे आदेश दिले असून सुनावणीची पुढील तारीख ही १० जून रोजी ठेवण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात श्री. अमृत काळदाते यांच्या या याचिकेवर निर्णय होईपर्यंत या संदर्भाने करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही आणि कृती ही या याचिकेच्या निर्णयाच्या अधीन असेल असेही न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे श्री.अमृत काळदाते हे होऊ घातलेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये गटनेते म्हणून गटातील सर्व सदस्यांना व्हीप बजावण्याची शक्यता आहे. दरम्यान, कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांची निवडणूक झाली असली तरी अद्याप उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक बाकी आहे. त्यामुळे कोणत्या गटनेत्याचा व्हीप पाळावा, याबाबतीत संभ्रम व संदिग्धता निर्माण झाली आहे परिणामी भविष्यात गटातील सर्वच नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार राहणार असून याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

'सत्ताधाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांवर दबाव आणून आपल्याला हवा तसा कोणताही निर्णय घेतला तरी उद्या या निर्णयाची पडताळणी ही उच्च न्यायालयातच होणार आहे. न्यायालये ही कोणत्याही दबावाखाली काम करत नसल्याने उच्च न्यायालयाकडून योग्य निर्णय होईल आणि आम्हाला न्याय मिळेल, असा विश्वास आहे. विचार आणि निवडणूक काळात आमदार रोहितदादा पवार यांनी केलेले कष्ट विसरून जाणाऱ्यांची बोलती न्यायालयाच्या निर्णयानंतर बंद झाल्याशिवाय राहणार नाही.'' अशी प्रतिक्रीया कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष नामदेवबापू राऊत यांनी माध्यमांशी बोलतांना दिली.

## पार्थ सैनिकी शाळेच्या १०० टक्के निकालाची सलग १८ वर्षापासूनची परंपरा कायम

**जालना । प्रतिनिधी -** येथील मत्स्योदरी शिक्षण संस्था संचलित, पार्थ सैनिकी शाळा जालना या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने यंदाही इयत्ता १० वीच्या १०० टक्के निकालाची परंपरा मागील सलग १८ वर्षांपासून कायम राखली आहे. केवळ संख्यात्मक निकाल न देता शाळेने याही वर्षी गुणात्मक निकालाची परंपरा कायम राखली आहे. जालना जिल्ह्यातील एकमेव इंग्रजी माध्यमाची सैनिकी शाळा शाळा आहे. गुणानुक्रमे धिरज गुलाबराव मोरे हा विद्यार्थी ९४.४० टक्के गुण घेवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. शुभम् पांडुरंग जंजाळ याने ९२.२० टक्के गुण घेवून व्दितीय क्रमांक मिळवला आहे. रामराजे मनोज पवार व हर्षवर्धन बद्रीनारायण नागवे यांनी ९१.४० टक्के तृतीय क्रमांक पटकावला आहे. मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव सौ. मनिषाताई टोपे, डॉ. बी. आर. गायकवाड, राहुल भालेकर व प्राचार्य मोहन नेहेरे व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### निरंकारी भक्तगणांकडून समर्पण दिवसानिमित्त बाबा हरदेवसिंहजी यांना श्रद्धा सुमने अर्पित

# समर्पण फक्त शब्दांपुरते सीमित न राहता ते प्रत्येक कृतीतून दिसावे - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** संत निरंकारी मिशनच्या वतीने समर्पण दिवसाचे औचित्य साधून युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ एक भावपूर्ण वर्चुअल संत समागम आयोजित करण्यात आला. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता जी यांच्या पावन उपस्थितीत १३ मे रोजी आयोजित केलेल्या या समागमात देशविदेशातून लाखो श्रद्धाळूंनी ऑनलाइन सहभाग घेतला. समर्पण दिवसाच्या निमित्ताने निरंकारी भवन गांधी चमन जुना , जालना येथे विशेष सत्संग समारोहाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये शेकडो भाविक भक्तगणांनी भाग घेतला आणि बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे दिव्य जीवन व शिकवणूकीतून प्रेरणा प्राप्त केली.

या दिवशी सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी वर्चुअल सत्संगाद्वारे श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सांगितले की सतगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे जीवन क्षणोक्षणी प्रेम, त्याग, सेवा आणि दिव्य शिकवणूकींनी परिपूर्ण होते. असेच भक्तिभावाचे समर्पित जीवन आपलेही व्हावे, असे त्यांनी प्रतिपादन केले. समर्पण फक्त शब्दांत न राहता ते आचरणात उतरायला हवे.

सतगुरु मातांनी स्पष्ट केले की खरी श्रद्धा आणि प्रेम हे केवळ बोलण्यातून नाही, तर कृतीतून व्यक्त होतात. जर आपण बाबाजींची शिकवण फक्त सोशल मिडियापुरतीच मर्यादित ठेवत असू, तर ते खरे समर्पण नाही. खरे समर्पण तेव्हाच प्रकट होते जेव्हा आपण आत्मपरीक्षण करून पहावे, की आपण खरोखरच नम्रता, क्षमा आणि प्रेम यांचे पालन करत आहोत का? त्यांच्या जीवनातील प्रत्येक पैलू साध-संगतसाठी मार्गदर्शक होता. समर्पण दिवस ही केवळ एक तारीख नसून, ही एक संधी आहे विचार करण्याची की - आपण खरोखरच आपल्या जीवनाला या शिकवणींशी जोडले आहे का? प्रेम, एकता, मानवता आणि विनम्रता हे आपल्या जीवनात आत्मसात करूनच आपण या दिवसाला खरा अर्थ देऊ शकतो. हाच बाबाजींच्या प्रति खरा आदर आणि समर्पण ठरेल.



या प्रसंगी भाविक भक्तगणांनी आपले विचार, गीत, कविता आणि भजनांच्या माध्यमातून बाबाजींच्या करुणा, प्रेम व समर्पणाची अनुभूती पुन्हा जिवंत केली. सतगुरु माताजींनी श्रद्धेय अवनीतजी यांचा सन्मानपूर्वक उल्लेख करताना त्यांना एक खरा गुरसिख म्हटले, ज्यांनी आपल्या आचरणातून समर्पणाचा आदर्श उभा केला. समर्पण दिवसाच्या या व्हर्च्युअल संत समागमामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन हस्ते 'हरदेव वचनामृत' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. हे एक सुसंगत व सारगर्भित संकलन आहे, ज्यामध्ये बाबा बाबा हरदेवसिंहजी यांचे दिव्य विचार, उपदेश आणि वचने एकत्रित करण्यात आली आहेत. 'हरदेव वचनामृत' हे केवळ एक पुस्तक नसून एक आध्यात्मिक अमृत आहे जे वाचकांना बाबाजींच्या शिकवणूकीच्या गाभ्याशी जोडते. या संग्रहात प्रेम, सेवा, नम्रता, एकता आणि निरंकाराशी दृढ अनुसंधान यांसारख्या मुलभूत तत्वांचे विश्लेषण अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत मांडले आहे. हे संकलन म्हणजे बाबाजींच्या अंत:करणाचा आवाज आहे जो भावी पिढ्यांना प्रत्येक युगामध्ये मार्गदर्शक ठरत राहील. निश्चितच, बाबा हरदेवसिंहजी यांची दिव्य प्रतिमा प्रत्येक भाविक भक्ताच्या अंत:करणात एक अमिट आठवण म्हणून कायम राहील. त्यांच्या अमूल्य उपकारांसाठी संपूर्ण निरंकारी परिवार त्यांचा सदैव कृतज्ञ राहील. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज, बाबाजींची शिकवण पुढे घेऊन जात असून ब्रह्मज्ञानाच्या दिव्य प्रकाशाने संपूर्ण मानवतेला उजळवत आहेत.

# विश्वशांती दूत भगवान गौतम बुद्धाला धम्मफेरी काढून अभिवादन

**मंठा । प्रतिनिधी -** भगवान बुद्धाच्या जीवन काळातील त्यांचा 'जन्म', त्यांची 'ज्ञानप्राप्ती' आणि त्यांचं 'महापरिनिर्वा'ण या तिन्ही घटना वैशाख पौर्णिमेला झाल्यामुळं या पौर्णिमेला 'बुद्ध पौर्णिमा' असं म्हटलं जातं. हा दिवस म्हणजे अत्यंत महत्त्वाचा दिवस म्हणून ओळखला जातो. जर बुद्ध या जगात जन्माला आले नसते, तर खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा, रूढी, परंपरा आजही चालूच राहिल्या असत्या. ज्यामुळं देश लयास केला असता जगाला बुद्धाच्या विचाराने प्रेरित केल्याने जगामध्ये शांती नांदत आहे. अशा बुद्धांचा जन्म या देशात झाला, आज बुद्धांच्या विचारांची गरज आज जगाला आहे. युद्ध नको बुद्ध हवा आहे असं संपूर्ण जग म्हणत आहे. जगातील लोक ही बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहामध्ये आनंदामध्ये साजरी मंठा शहरामध्ये विश्वशांती दूत महा कारणे तथागत भगवान गौतम बुद्धाला डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव १३४ समिती मंठाच्या वतीने काढून अभिवादन करण्यात धम्मपर सर्व बांधव माता भगिनी बालक पांढऱ्या शुभ्र मध्ये होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये मनीषा प्रदीप चव्हाण यांच्या वतीने प्रथम येथे पूजन करून हार घालून सामूहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.




आले. बुद्ध पौर्णिमेचे महत्त्व बुद्ध पौर्णिमा बुद्धांच्या पुढील शिकवणींची एक शक्तिशाली आठवण करून देते करुणा अहिंसा (अहिंसा) सजगता भौतिक इच्छांपासून अलिप्तता मुक्तीचा मार्ग (निर्वाण) हा दिवस अनुयायांना त्यांच्या कृतींवर चिंतन करण्यास आणि नैतिक आचरण, मानसिक शिस्त आणि ज्ञानाचे जीवन जगण्यास प्रोत्साहित करतो - बौद्ध धर्मातील अष्टांगिक मार्गाचे पालन केले जाते.

दीपस्तंभ रेमेडी

http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/



वृतपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

# व्यापारी अधिवेशनाला उपस्थित राहावे- हस्तीमल बंब

**परतूर । प्रतिनिधी** - व्यापाऱ्यांच्या हिताच्या निर्याया बाबत येत्या एक जून रोजी जालना येथे संपन्न होणाऱ्या आधीवेशनाला मोठ्या संख्येने उपस्तितीत राहण्याचे आहवन व्यापारी महासंघाचे जिल्हाधक्ष हस्तीमल बंब यांनी केले.

याबाबत परतूर येथे बाजार समिती दालनात पार पडलेल्या बैठकीत ते बोलत होते.



यावेळी हसिमल जी बम ( जिल्हाध्यक्ष जनरल मर्चंट असोसिएशन), सुभाष सोनवणे ( फिजिओथेरपिस्ट), मकरंद शहापूरकर (डिजिटल ऑर्बिट प) यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना बंब यांनी म्हटले कि जिल्ह्यात परतूर तालुक्यातील व्यापाऱ्यांचे संघटना चालवळीत मोठे योगदान असून प्रतोक वेळी येथील व्यापारी बांधव कार्यतात्परता दाखवत व्यापारी हितासाठी संघनतानंत्मक योगदान दर्श्वतात. येथील व्यापारपेठ देखील चांगली असून व्यापाऱ्यांच्या हिताच्या निर्णयासाठी सदरील अधिवेश्नात महत्वाचे निर्णय ठरणार असून यावेळी सर्वांनी उपस्तितीत राहण्याचे आहवन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान परतूर व्यापाऱ्यांच्या वतीने निर्वाचित व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष राजेश मस्के यांनी

परतूर कार्यक्षेत्रातून मोठ्या संख्येने व्यापारी बांधव या अध्विेषणाला सहभाग दर्श्वणार असल्याचे अभिवचन दिले.

यावेळी शहरातील व्यापारी महासंघ तालुका संघटक दिलीप होलानी, व्यापारी महासंघ अध्यक्ष सुरेश जी मंत्री,उपाध्यक्ष राजू मस्के , गोविंदजी मोर, अश्विन दायमा,पिंटूजी मूंदड़ा,राजू भाऊ कादे ,जनरल मर्चंड अध्यक्ष धीरज भंडारी,सरताज भाई ताम्बोली यांची उपस्थिती होती.

# श्रेया जाधव हिचे घवघवीत यश



**जालना । प्रतिनिधी** - येथील श्रेया भगवान जाधव हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षा दहावीत घवघवीत यश संपादन केले आहे. तिने ५०० पैकी ४२३ गुण मिळवत ८४.६० टक्के प्राप्त केले आहे. मराठीत ९२, संस्कृत ७२, इंग्रजी ७८, गणित ८८, सायन्य ॲण्ड टेक्नॉलॉजी ६२, सोशल सायन्स ९० गुण मिळाले आहे. तिच्या यशाबद्दल तिचे शाळेचे मुख्याध्यापक एस.एम.वानगोता यांच्यासह सर्व शिक्षक गण, भगवान जाधव, रेखा जाधव, संतोष जाधव, आनंद जाधव, उद्धव केंधळे, चंदा केंधळे, रविंद्र वायाळ, रेणुका वायाळ, विमल शेळके, दीपक शेळके, वर्षा शेळके आदी मित्र परिवारातून अभिनंदन होत आहे.

# अफ़रा नहदियाला दहावीच्या परीक्षेत ९३.६० टक्के गुण



**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२५ घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला . जालना शहरातील उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी अफ़रा नहदिया लियाकत अली खान यासीर हिने ९३.६० टक्के गुण घेत विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे. अफरा नहदिया ही ज्येष्ठ पत्रकार लियाकत अली खान यासिर यांची कन्या आहे. अफरा नहदिया लियाकत अली खान यासिर हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अंजुमन ईशात ए तालिम उर्दू हायस्कूलचे सचिव मुहम्मद इफ्तिखारुद्दीन, मुख्याध्यापक मुहम्मद नबील अहमद, वर्गशिक्षिका रईसा बाजी, मौलाना मुहम्मद इब्राहिम, अर्शद सर आणि इतर शिक्षक आणि नातेवाईक, मित्रांनी तिचे स्वागत केले आहे.

# दहावीच्या परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला परतूरच्या विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश

**परतूर । प्रतिनिधी** - परतूर शहरातील सर्वात जुनी व प्रतिष्ठित भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला परतूर शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. दहावीच्या परीक्षेला एकुण १७१ विद्यार्थी बसले होते. पैकी १७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १७० पैकी १६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले . शाळेचा एकूण निकाल ९७ टक्के लागला आहे . उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ७१ विद्यार्थ्यांनी ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. यापैकी ९० % पेक्षा अधिक गुण घेणारे १० विद्यार्थी आहेत. कार्तिक रामेश्वर दिरंगे ९७.८०%, दुगाने प्रतीक्षा रवी ९४.00%, माथने शिवराज रावसाहेब ९३.८०%, भुंबर पुनम लक्ष्मण ९३.८०%, सरगर सीमा दत्ता ९३%, कायम खानी फरीहा हमीद खान ९२.२०%, देशमुख मलिहा खालील अहमद ९१.८०%, गुंजाळ पुजा शरद ९१.६०%, बोनगे ऋतुजा सुरेश ९१.६०%, रोटे प्रथमेश रामेश्वर ९१.00%,



अंभुरे अनुष्का किशोर ८९.८०%, नवल सिद्धी साहेबराव ८९.२०%. सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे प्रशालेचे मुख्याध्यापक गणेश राठोड, भगवानराव मोरे, दया काटे महाराज, रमाकांत बरिदे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आणि सर्व मार्गदर्शक शिक्षकांच्या वतीने अभिनंदन केले आहे.

# आरएचव्हीच्या इंग्रजी माध्यमातून कौशिक पठाडे सर्वप्रथम

**जालना । प्रतिनिधी** - येथील राष्ट्रीय हिन्दी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम शाळेचा विद्यार्थी कौशिक कृष्णा पठाडे याने दहावीच्या परिक्षेत ९४.४० टक्के गुण मिळवुन नेत्रदिपक यश संपादीत संपादित केले असून, विद्यालयातुन सर्वप्रथम येण्याचा बहुमानही त्याला मिळाला आहे. कौशिक याला हिंदी विषयात ९२, मराठीत ९५, गणितात ९७, विज्ञानमध्ये ९५ आणि समाजशास्त्र विषयात ९६ याप्रमाणे एकुण ५०० पैकी ४७२ म्हणजे ९४.४० टक्के गुण मिळाले आहेत. त्याने या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांसह शिक्षकांना दिले आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.